RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

वर्ष ९, अंक ३९] शुक्रवार, नोव्हेंबर १०, २०२३/कार्तिक १९, शके १९४५ [पृष्ठे ९, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**अधिसूचना**

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्र. मविनिआ/तांत्रिक/विनियम/०५९५.– विद्युत अधिनियम, २००३ च्या (२००३ चा ३६) कलम ६१ आणि कलम ८६ (३) सह कलम १८१ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि वीज दर धोरण, २०१६ च्या खंड ५.३ च्या अनुषंगाने तसेच या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करून आणि पूर्व प्रसिद्धीनंतर, ' महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६ ' सह, ' महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) (पहिली सुधारणा) विनियम, २०१९ ' ('मुख्य विनियम ') या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :

**1. प्रस्तावना**

विद्युत अधिनियम, २००३ (' वि. अ. २००३ ' किंवा ' अधिनियम ') च्या कलम ८६(१)(इ) नुसार, राज्य विद्युत नियामक आयोगावर (' एसइआरसी ' किंवा ' आयोग ') ग्रीडशी जोडणीयता देण्यासाठी आणि कोणत्याही व्यक्तीस विजेची विक्री करण्यासाठी सुयोग्य उपाययोजना प्रदान करून नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीस चालना देण्याचे कार्य सोपवण्यात आले आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. ३० मार्च, २०१६ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६ आणि दि. ०८ जून, २०१९ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) (पहिली सुधारणा) विनियम, २०१९ अधिसूचित केले आहेत. त्यानंतर, ऊर्जा मंत्रालयाने विद्युत (हरित ऊर्जा मुक्त प्रवेशाद्वारे नूतनशील ऊर्जेस चालना) नियम, २०२२ मध्ये अधिसूचित केलेल्या पहिल्या आणि दुसऱ्या सुधारणांसह काही क्षेत्रीय घडामोडी घडल्या आहेत. हे बदल महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश)(दुसरी सुधारणा) विनियम, २०२३ मध्ये समुचितपणे समाविष्ट करण्यात आले आहेत.

**२. संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ :—**

२.१ या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश)(दुसरी सुधारणा) विनियम, २०२३" असे म्हणावे.

२.२ हे विनियम **शासकीय राजपत्रातील** त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**३. मुख्य विनियमांचा भाग ए : प्रारंभिक मधील विनियम २ मध्ये सुधारणा :—**

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१(७) नंतर २.१(७)(ए) ची भर :—**

"२.१ (७)(ए) "केंद्रीय नोडल एजन्सी" म्हणजे केंद्र सरकारने नूतनशील ऊर्जेसाठी एकल खिडकी हरित ऊर्जा मुक्त प्रवेश यंत्रणेची स्थापना आणि संचालन करण्यासाठी अधिसूचित केलेली नोडल एजन्सी होय."

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१(१९) नंतर २.१(१९)(ए) आणि २.१(१९)(बी) ची भर :—**

"२.१ (१९)(ए) "एन्टीटी" म्हणजे स्व-वापरासाठी निर्माण करण्यात आलेल्या विजेच्या उपयोगकर्त्या व्यतिरिक्त (कॅप्टिव्ह युजर), कोणताही असा ग्राहक ज्याची करारबद्ध मागणी किंवा मंजूर भार, कोणत्याही वितरण परवानाधारकाच्या एकाच विद्युत परिमंडलामध्ये स्थित असलेल्या बहुविध जोडण्यांच्या माध्यमातून शंभर किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक आहे.

परंतु असे की, कॅप्टिव्ह उपयोगकर्त्याच्या बाबतीत कोणतीही भार मर्यादा असणार नाही.

परंतु आणखी असे की, वरील परवाना क्षेत्र प्रतिबंध केवळ महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडला (महावितरण कंपनी) लागू राहतील आणि सर्व अन्य वितरण परवानाधारकांसाठी, विचारात घ्यावयाचे क्षेत्र संपूर्ण परवाना क्षेत्रा इतके राहील;

२.१(१९)(बी) "नियामकांचा मंच" म्हणजे अधिनियमांच्या कलम १६६ च्या उप-कलम(२) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे असलेला मंच होय."

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१(२०)(ए) नंतर २.१(२०)(बी) आणि २.१(२०)(सी) ची भर :—**

"२.१ (२०)(बी) "हरित अमोनिआ" म्हणजे बॅन्क करण्यात आलेल्या नूतनशील ऊर्जेसह, नूतनशील ऊर्जेचा वापर करून पाण्याच्या विद्युत-अपघटनाद्वारे (इलेक्ट्रोलिसिस) उत्पादित केलेला अमोनिआ आणि बायोमासपासून उत्पादित केलेला अमोनिआ होय ;

"२.१ (२०) (सी) "हरित हायड्रोजन" म्हणजे विद्युत-अपघटन (इलेक्ट्रोलिसिस) किंवा बायोमासच्या रुपांतरणाद्वारे, परंतु त्यापुरतेच मर्यादित नाही, उत्पादित केलेल्या हायड्रोजनसह, नूतनशील ऊर्जेचा वापर करून उत्पादित केलेला हायड्रोजन होय, जेथे नूतनशील ऊर्जेमध्ये लागू असलेल्या विनियमांनुसार ऊर्जा साठवणूक यंत्रणा किंवा ग्रिडमध्ये बॅन्क केलेल्या नूतनशील स्त्रोतांपासून निर्माण केलेल्या विजेचा देखील समावेश असतो;

**ज्याअर्थी, विद्युत-अपघटनाद्वारे (इलेक्ट्रोलिसिस) उत्पादित हरित हायड्रोजनसाठी :—** पाण्यावरील प्रक्रिया, विद्युत-अपघटन (इलेक्ट्रोलिसिस), वायु शुद्धीकरण आणि हायड्रोजनचे शुष्कन व संपीडन यामधून निर्माण झालेल्या गैर-जैविक हरितगृह वायुचे उत्सर्जन, मागील १२ महिन्यांच्या कालावधीत सरासरी म्हणून घेतलेल्या प्रति किलोग्रॅम हायड्रोजनच्या (kg $CO_2$ eq/kg Hydrogen) सममूल्य २ किलोग्रॅम कार्बन डायऑक्साईड पेक्षा जास्त नसावे;

**ज्याअर्थी, बायोमासच्या रुपांतरणाद्वारे उत्पादित हरित हायड्रोजनासाठी :—** बायोमासवरील प्रक्रिया, उष्णता/बाष्प निर्मिती, बायोमासचे हायड्रोजनमध्ये रुपांतरण, वायु शुद्धीकरण आणि हायड्रोजनचे शुष्कन व संपीडन यामधून निर्माण होणारे गैर-जैविक हरितगृह वायुचे उत्सर्जन, मागील १२ महिन्यांच्या कालावधीत सरासरी म्हणून घेतलेल्या प्रति किलोग्रॅम हायड्रोजनच्या (kg $CO_2$ eq/kg Hydrogen) सममूल्य २ किलोग्रॅम कार्बन डायऑक्साईड पेक्षा जास्त नसावे; "

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१ (३२) खालीलप्रमाणे बदलण्यात येईल :—**

" २.१ (३२) "नूतनशील ऊर्जा"/"हरित ऊर्जा" म्हणजे जल आणि जलसाठ्यासह (नूतनशील ऊर्जेसाठी जलसाठ्याचा वापर केल्यास) किंवा भारत सरकारकडून वेळोवेळी अधिसूचित केलेल्या अन्य कोणत्याही तंत्रज्ञानासह नूतनशील ऊर्जा

स्त्रोतांपासूनची विद्युत ऊर्जा, आणि त्यामध्ये केंद्र सरकारकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे अन्य कोणत्याही स्त्रोतानुसार, हरित हायड्रोजन किंवा हरित अमोनियासह, कोणत्याही तंत्राचा देखील समावेश असेल ज्याद्वारे हरित ऊर्जेचा उपयोग जीवाश्म इंधनाची प्रतिस्थापना करण्यासाठी करण्यात येतो. ”

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१(३२) नंतर २.१(३२)(ए) ची खालीलप्रमाणे भर :—**

“२.१ (३२)(ए) “नियम” म्हणजे विद्युत (हरित ऊर्जा मुक्त प्रवेशाद्वारे नूतनशील ऊर्जेचे संवर्धन) नियम, २०२२ आणि त्यामध्ये त्यानंतर करण्यात आलेल्या सुधारणा होय.”

**४. मुख्य विनियमांच्या विनियम ३ मध्ये सुधारणा :—**

**मुख्य विनियमांच्या विनियम ३.२ चे दुसरे आणि आठवे परंतुक रद्द करण्यात येते.**

**मुख्य विनियमांच्या विनियम ३.२ नंतर विनियम ३.३ आणि ३.४ ची भर :—**

“३.३ विनियम ३.२ मध्ये कोणतीही तरतूद असली तरी, १०० किलोवॅट किंवा त्यापेक्षा जास्त किंवा नियमांमध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणांनुसार करारबद्ध मागणी किंवा मंजूर भार असलेला ग्राहक, किंवा वितरण परवानाधारकाच्या एकाच विद्युत परिमंडलामध्ये स्थित असलेल्या बहुविध जोडण्यांच्या माध्यमातून १०० किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक करारबद्ध मागणी किंवा मंजूर भार असलेली एन्टीटी, मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून हरित ऊर्जेपासून वीज घेण्यास पात्र राहील;

परंतु असे की, हरित ऊर्जा मुक्त प्रवेशा अंतर्गत वीज घेणाऱ्या कॅप्टिव्ह उपयोगकर्त्यांसाठी विजेच्या पुरवठ्याची कोणतीही मर्यादा असणार नाही;

परंतु आणखी असे की, वरील परवाना क्षेत्र प्रतिबंध केवळ महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडला (महावितरण कंपनी) लागू राहतील आणि सर्व अन्य वितरण परवानाधारकांसाठी, विचारात घ्यावयाचे क्षेत्र संपूर्ण परवाना क्षेत्रा इतके राहील;

परंतु आणखी असेही की, नूतनशील ऊर्जा निर्मात्यांकडून वीज घेणाऱ्या मुक्त प्रवेश ग्राहकांसाठी विनियम ३.२ मध्ये विनिर्दिष्ट केलेली करारांतर्गत मागणी किंवा मंजूर भाराच्या क्षमतेची मर्यादा लागू राहणार नाही, परंतु विनियम ८.१० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परिणामस्वरूप निर्माण होणाऱ्या विद्युत प्रवाहाच्या अटींच्या ती अधीन असेल;

परंतु आणखी असेही की, बहुविध जोडण्यांच्या बाबतीत हरित ऊर्जा मुक्त प्रवेशाच्या प्रारंभापूर्वी, ग्राहक वितरण परवानाधारकास हरित ऊर्जा प्रकल्पामधून प्रत्येक जोडणीला होणाऱ्या ऊर्जा निर्मितीच्या टक्केवारीबाबत आगाऊ कळविल, जेणेकरून वितरण परवानाधारकाला त्याचा उचित हिशोब ठेवणे शक्य होईल;

परंतु आणखी असेही की, हरित ऊर्जा मुक्त प्रवेश ग्राहक किमान बारा-काल गटांसाठी मुक्त प्रवेशाद्वारे वापरलेल्या विजेच्या प्रमाणामध्ये बदल करणार नाहीत;

परंतु आणखी असेही की, नूतनशील ऊर्जा निर्मितीपासून होणाऱ्या पर्यावरणीय लाभांसह (ग्रीन अॅट्रीब्युट्स) वीजनिर्मिती केली तरच फक्त हरित ऊर्जा मुक्त प्रवेशाच्या तरतुदी लागू होतील आणि वीजनिर्माता स्वतंत्रपणे आरईसी/ नूतनशील घटक विकत असल्यास नाही.

३.४ विनियम ३.२ किंवा ३.३ मधील, जसे असेल तसे, पात्रता निकष पूर्ण करण्याच्या अधीन राहून, छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणा असणारा ग्राहक या विनियमांतर्गत एकाच वेळी मुक्त प्रवेश प्राप्त करू शकतो;

परंतु आणखी असे की, अशा एकाच वेळी संचालना दरम्यान, नक्त मीटर/ छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक विनियमांतर्गत उपलब्ध असलेल्या बॅन्कीग क्रेडीटसाठी समायोजित केलेल्या मीटरवर नोंद झालेल्या नक्त वीज खेचणीचा वापर मुख्य विनियमांच्या विनियम १४.१० मध्ये नमूद केलेल्या प्राधान्यक्रमानुसार ऊर्जा क्रेडीट समायोजित करण्यासाठी करण्यात येईल. ”

**५. मुख्य विनियमांच्या विनियम ४ मध्ये सुधारणा :—**

**मुख्य विनियमांच्या विनियम ४.१ मध्ये ३ऱ्या परंतुकाची भर :—**

“ परंतु आणखी असे की, हरित ऊर्जा मुक्त प्रवेश मागण्यासाठी केंद्रीय नोडल एजन्सीने नियमांतील तरतुदींनुसार तयार केलेल्या कार्यपद्धती आणि नमुन्यांचे अनुसरण करण्यात येतील.”

**६. मुख्य विनियमांच्या विनियम ८ मध्ये सुधारणा :—**

**मुख्य विनियमांच्या विनियम ८.१ च्या दुसऱ्या परंतुकानंतर ३, ४ आणि ५ व्या परंतुकांची भर :—**

"परंतु आणखी असे की, हरित ऊर्जा मुक्त प्रवेश मागण्यासाठी केंद्रीय नोडल एजन्सीने नियमांतील तरतुदींनुसार तयार केलेल्या नमुने आणि वेळापत्रकाचे अनुसरण करण्यात येईल ;

परंतु असेही की, केंद्रीय नोडल एजन्सीने तयार केलेल्या कार्यपद्धतीमध्ये ठरवून दिल्याप्रमाणे, अल्प-कालीन हरित ऊर्जा मुक्त प्रवेशाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र आणि मध्यम/दीर्घ कालीन हरित ऊर्जा मुक्त प्रवेशाच्या बाबतीत राज्य पारेषण कंपनी नोडल एजन्सी म्हणून काम करेल;

परंतु असेही की, संबंधित वितरण परवानाधारक, केंद्रीय नोडल एजन्सीने हरित मुक्त प्रवेशासाठी तयार केलेल्या नियम आणि कार्यपद्धतीमध्ये ठरवून दिलेल्या वेळापत्रकाचे पालन करणे शक्य होण्यासाठी, नोडल एजन्सीला आवश्यक तो सर्व तपशील पुरविल."

**७. मुख्य विनियमांच्या विनियम १४ मध्ये सुधारणा :—**

**मुख्य विनियमांच्या विनियम १४.७(ड) च्या पहिल्या परंतुकानंतर २ आणि ३ ऱ्या परंतुकांची भर :—**

"परंतु आणखी असे की, गैर-जीवाश्म इंधनावर आधारित कचऱ्यापासून वीजनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज मुक्त प्रवेश ग्राहकांना पुरविल्यास क्रॉस सबसिडी अधिभार लागू राहणार नाही ;

परंतु असेही की, हरित ऊर्जेचा वापर हरित हायड्रोजन आणि हरित अमोनियाच्या उत्पादनासाठी करण्यात येत असेल तर क्रॉस सबसिडी अधिभार लागू राहणार नाही."

**मुख्य विनियमांच्या विनियम १४.८(ड) च्या पहिल्या परंतुकानंतर २, ३, ४ आणि ५व्या परंतुकांची भर :—**

"परंतु आणखी असे की, गैर-जीवाश्म इंधनावर आधारित कचऱ्यापासून वीजनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज मुक्त प्रवेश ग्राहकांना पुरविल्यास अतिरिक्त अधिभार लागू राहणार नाही ;

परंतु असेही की, हरित ऊर्जेचा वापर हरित हायड्रोजन आणि हरित अमोनियाच्या उत्पादनासाठी करण्यात येत असेल तर अतिरिक्त अधिभार लागू होणार नाही ;

परंतु आणखी असेही की, डिसेंबर, २०३२ पर्यंत कार्यान्वित झालेल्या आणि मुक्त प्रवेश ग्राहकांना वीज पुरवठा केलेल्या, किनाऱ्यापासून दूर असलेल्या पवन ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विजेच्या बाबतीत अतिरिक्त अधिभार लागू होणार नाही;

परंतु असेही की, जर अशा ग्राहकांकडून स्थिर आकारांचा भरणा करण्यात येत असेल तर , हरित ऊर्जा मुक्त प्रवेश ग्राहकांसाठी अतिरिक्त अधिभार लागू राहणार नाही."

**८. मुख्य विनियमांच्या विनियम १७ मध्ये सुधारणा :—**

**मुख्य विनियमांच्या विनियम १७.१च्या पहिल्या परंतुकानंतर २ऱ्या परंतुकाची भर :—**

"परंतु आणखी असे की, १ मेगावॅट पेक्षा कमी करारांतर्गत मागणी असलेल्या ग्राहकांना हरित ऊर्जा मुक्त प्रवेशास, सर्व उच्च दाब ग्राहकांसाठी विशेष ऊर्जा मीटरच्या आधारावर आणि सर्व पात्र लघु दाब ग्राहकांसाठी टीओडी मीटरच्या आधारावर, परवानगी देण्यात येईल."

**९. मुख्य विनियमांच्या विनियम २० मध्ये सुधारणा :—**

**मुख्य विनियमांचा विनियम २०.४ खालीलप्रमाणे बदल :**

"२०.४ बॅन्किग आकार बॅन्क केलेल्या ऊर्जेच्या ८ टक्के प्रमाणात समायोजित करण्यात येतील."

**मुख्य विनियमांचा विनियम २०.५ खालीलप्रमाणे बदल :**

"२०.५ न वापरलेली शिल्लक बॅन्क ऊर्जा प्रत्येक बॅन्कीग चक्राच्या शेवटी व्यपगत मानण्यात येईल.

परंतु असे की, नूतनशील ऊर्जा निर्मिती केंद्राला व्यपगत झालेल्या बॅन्क ऊर्जेच्या मर्यादेपर्यंत नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र मिळण्याचा हक्क राहील ; ”

मुंबई,
दिनांक १० नोव्हेंबर, २०२३.

**डॉ. राजेंद्र गं. आंबेकर,**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

## MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

*NOTIFICATION*

ELECTRICITY ACT, 2003.

No. MERC/Tech/Regulation/0595.—In exercise of the powers conferred under Section 61 and Section 86(3) read with Section 181 of the Electricity Act, 2003 (36 of 2003) and in pursuance to Clause 5.3 of the Tariff Policy, 2016 and all other powers enabling it in this behalf, and after previous publication, the Maharashtra Electricity Regulatory Commission makes the following Regulations to amend the Maharashtra Electricity Regulatory Commission (Distribution Open Access) Regulations, 2016 read with Maharashtra Electricity Regulatory Commission (Distribution Open Access) First Amendment Regulations 2019 ('the Principal Regulations'), namely :–

*1. Preamble :—*

As per Section 86 (1)(e) of the Electricity Act, 2003 ("EA 2003" or "the Act"), the State Electricity Regulatory Commissions ("SERCs" or "Commissions") have been assigned the function of promoting generation of electricity from renewable sources of energy by providing suitable measures for connectivity with the grid and sale of electricity to any person. The Maharashtra Electricity Regulatory Commission notified the Maharashtra Electricity Regulatory Commission (Distribution Open Access) Regulations, 2016 on March 30, 2016 and Maharashtra Electricity Regulatory Commission (Distribution Open Access) (First Amendment) Regulations, 2019 on June 08, 2019. There have been certain sectoral developments, including the First and Second Amendments notified by the Ministry of Power (MoP) to the Electricity (Promoting Renewable Energy Through Green Energy Open Access) Rules, 2022. These changes have been appropriately incorporated in the Maharashtra Electricity Regulatory Commission (Distribution Open Access) (Second Amendment) Regulations, 2023.

*2. Short title and commencement :—*

2.1. These Regulations may be called the Maharashtra Electricity Regulatory Commission (Distribution Open Access) (Second Amendment) Regulations, 2023.

2.2. These Regulations shall come into force from the date of their publication in the *Official Gazette.*

*3. Amendment to Regulation 2 in Part A: PRELIMINARY of the Principal Regulations* :—

Introduction of Regulation 2.1(7)(a) after Regulation 2.1(7) of the Principal Regulations :—

"2.1(7)(a) "Central Nodal Agency" means the nodal agency notified by the Central Government to set up and operate a single window green energy open access system for renewable energy."

Introduction of Regulation 2.1(19)(a) and 2.1(19)(b) after Regulation 2.1(19) of the Principal Regulations :—

"2.1(19)(a) "Entity" means any consumer who has contracted demand or sanctioned load of Hundred kW or more either through multiple connections aggregating Hundred kW or more located in same electricity circle of a Distribution Licensee, except for captive consumers :

Provided that in case of captive consumers, there shall not be any load limitation ;

Provided further that the above licence area restriction shall be applicable to the Maharashtra State Electricity Distribution Company Limited (MSEDCL) only and for all other Distribution Licensees, the area to be considered shall be equal to the entire licence area ;

"2.1(19)(b) "Forum of Regulators" means the Forum as referred to in sub-section (*2*) of Section 166 of the Act.

Introduction of Regulation 2.1(20)(b) and 2.1(20)(c) after Regulation 2.1(20)(a) of the Principal Regulations :—

"2.1(20)(b) "Green Ammonia" means ammonia produced by way of electrolysis of water using Renewable Energy; including Renewable Energy that has been banked and the ammonia produced from biomass ;

"2.1(20)(c) "Green Hydrogen" means Hydrogen produced using Renewable Energy, including, but not limited to, production through electrolysis or conversion of biomass, where Renewable Energy also includes such electricity generated from Renewable sources stored in an energy storage system or banked with the grid in accordance with applicable Regulations :

Whereas, for Green Hydrogen produced through electrolysis : - The non-biogenic greenhouse gas emissions arising from water treatment, electrolysis, gas purification and drying and compression of hydrogen shall not be greater than 2 kilogram of carbon dioxide equivalent per kilogram of Hydrogen (kg CO2 eq/kg Hydrogen), taken as an average over last 12-month period ;

Whereas, for Green Hydrogen produced through conversion of biomass : -The non-biogenic greenhouse gas emissions arising from biomass processing, heat/steam generation, conversion of biomass to hydrogen, gas purification and drying and compression of hydrogen shall not be greater than 2 kilogram of carbon dioxide equivalent per kilogram of Hydrogen (kg CO2 eq/kg Hydrogen) taken as an average over last 12-month period ;"

Substitution of Regulation 2.1(32) of the Principal Regulations :—

"2.1(32) "Renewable Energy" / "Green energy" means the electrical energy from renewable sources of energy including hydro and storage (if the storage uses renewable energy) or any other technology as may be notified by the Government of India from time to time and shall also include any mechanism that utilises green energy to replace fossil fuels including production of green hydrogen or green ammonia as per any other sources, as may be, determined by the Central Government."

Introduction of Regulation 2.1.(32)(a) after Regulation 2.1(32) of the Principal Regulations:—

"2.1(32)(a) "Rules" shall mean the Electricity (Promoting Renewable Energy Through Green Energy Open Access) Rules, 2022 and subsequent amendments.

*4. Amendment to Regulation 3 of the Principal Regulations* :—

2nd and 8th Provisos to Regulation 3.2 of the Principal Regulations stand deleted.

Introduction of Regulation 3.3 and 3.4 after Regulation 3.2 of the Principal Regulations :

"3.3 Notwithstanding anything contained in Regulations 3.2, Consumers having Contract Demand or Sanctioned Load of 100 kW or more or as may be amended in the Rules from time to time, or Entity through multiple connections aggregating 100 kW or more located in same electricity circle of a Distribution Licensee, shall be eligible to take power from Green Energy through Open Access :

Provided that there shall be no limit of supply of power for the captive consumers taking power under Green Energy Open Access ;

Provided further that the above licence area restriction shall be applicable to the Maharashtra State Electricity Distribution Company Limited (MSEDCL) only and for all other Distribution Licensees, the area to be considered shall be equal to the entire licence area ;

Provided also that for Open Access consumers sourcing power from renewable energy generators, capacity limit up to Contract Demand or Sanctioned Load as specified in Regulation 3.2 shall not be applicable, but shall be subject to conditions of resultant power flow specified under Regulation 8.10 :

Provided also that in case of multiple connections before start of Green Energy Open Access, consumers shall intimate the Distribution Licensee in advance regarding the percentage share of energy generation from the Renewable Energy projects to each connection so as to enable the Distribution Licensee to account for the same appropriately :

Provided also that Green Energy Open Access consumers shall not change the quantum of power consumed through open access for at least twelve-time blocks :

Provided also that provisions of Green Energy Open Access shall be applicable only if the power is sourced along with the Green attribute and not if generator is selling REC / renewable component separately."

3.4 Subject to meeting eligibility criteria under Regulation 3.2 or 3.3 as the case may be, Consumer having Roof Top Renewable Energy Generating Systems can simultaneously avail Open Access under these Regulations :

Provided that during such simultaneous operation, net drawl recorded on net-meter/meter adjusted for banking credit available under Rooftop Regulations shall be used for adjusting energy credit as per priority stipulated in Regulation 14.10 of the Principal Regulations."

*5. Amendment to Regulation 4 of the Principal Regulations :—*

Introduction of 3rd Proviso to Regulation 4.1 of the Principal Regulations :—

"Provided also that procedures and formats devised by Central Nodal Agency as per provisions of Rules shall be followed for seeking Green Energy open access."

*6. Amendment to Regulation 8 of the Principal Regulations :—*

Introduction of 3rd, 4th and 5th Provisos after 2nd Proviso to Regulation 8.1 of the Principal Regulations :

"Provided further that formats and timelines devised by Central Nodal Agency as per provisions of Rules shall be followed for seeking Green Energy open access :

Provided also that in case of Short-Term Green Energy Open Access, Maharashtra State Load Despatch Centre and in case of Medium / Long Term Green Energy Open Access, the State Transmission Utility shall perform duties of Nodal Agency as stipulated in the procedure framed by Central Nodal Agency :

Provided also that concerned Distribution Licensee shall provide all required details to the Nodal Agency so as to enable them to comply with the timelines stipulated in Rules and procedure for Green Open Access framed by the Central Nodal Agency."

*7. Amendment to Regulation 14 of the Principal Regulations :—*

Introduction of 2nd and 3rd Provisos after 1st Proviso to Regulation 14.7 (d) of the Principal Regulations :

"Provided further that cross-subsidy surcharge shall not be applicable in case power produced from a non-fossil fuel based Waste-to-Energy plant is supplied to the Open Access Consumer :

Provided also that Cross-subsidy surcharge shall not be applicable if green energy is utilized for production of green hydrogen and green ammonia."

Introduction of 2nd, 3rd , 4th and 5th Provisos after 1st Proviso to Regulation 14.8 (d) of the Principal Regulations :

"Provided further that additional surcharge shall not be applicable if power produced from a non-fossil fuel based Waste-to-Energy plant is supplied to the Open Access Consumer:

Provided also that additional surcharge shall not be applicable if green energy is utilized for production of green hydrogen and green ammonia :

Provided also that additional surcharge shall not be applicable in case of electricity produced from offshore wind projects, which are commissioned up to December, 2032 and supplied to the Open Access Consumers :

Provided also that additional surcharge shall not be applicable for Green Energy Open Access consumers, if fixed charges are being paid by such consumer."

*8. Amendment to Regulation 17 of the Principal Regulations :—*

Introduction of 2nd Proviso after 1st Proviso to Regulation 17.1 of the Principal Regulations:

"Provided further that Green Energy Open Access to Consumer with Contract Demand lower than 1 MW shall be allowed based on Special Energy Meter for all High Tension Consumers and ToD meter for all eligible Low Tension Consumers."

*9. Amendment to Regulation 20 of the Principal Regulations :—*

Substitution of Regulation 20.4 of the Principal Regulations :

"20.4 Banking charges shall be adjusted in kind @ 8% of the energy banked."

Substitution of Regulation 20.5 of the Principal Regulations :

"20.5 The un-utilised surplus banked energy shall be considered as lapsed at the end of each banking cycle :

Provided that the Renewable Energy generating station shall be entitled to get Renewable Energy Certificates to the extent of the lapsed banked energy."

Mumbai,
Dated : 10th November 2023.

DR. RAJENDRA G. AMBEKAR
Secretary,
Maharashtra Electricity Regulatory
Commission.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.